BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

विकसित भारत @ 2047 : बदलते भू-राजकारण, सामरिक स्वायत्तता आणि भारताची उदयोन्मुख जागतिक भूमिका

श्री. बबलू सुरेश मासोदकर

भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय परतवाडा,

मेल आयडी :- bablumasodkar123@gmail.com

सारांश

भारताने स्वातंत्र्याच्या अमृतकाळातून पुढे जात 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे ध्येय निश्चित केले आहे. 'विकसित भारत @ 2047' ही संकल्पना केवळ आर्थिक विकास किंवा सकल देशांतर्गत उत्पादन वाढीपुरती मर्यादित नसून आर्थिक स्पर्धात्मकता, सामाजिक समावेशन, तंत्रज्ञान, शाश्वत विकास, राष्ट्रीय सुरक्षा, सुशासन आणि जागतिक पातळीवरील प्रभावी भूमिका या सर्व घटकांचा समन्वय करणारी व्यापक संकल्पना आहे. नीती आयोगाच्या विविध दस्तऐवजांमध्येही विकसित भारताच्या संकल्पनेत आर्थिक प्रगतीसोबत राष्ट्रीय सुरक्षा, जागतिक भागीदारी, धोरणात्मक प्रभाव आणि सुशासनाला महत्त्व देण्यात आले आहे. दरम्यान, एकविसाव्या शतकातील जागतिक राजकारणामध्ये मोठे परिवर्तन होत आहे. अमेरिका-चीन स्पर्धा, रशिया-युक्रेन संघर्ष, इंडो-पॅसिफिक प्रदेशातील वाढते सामरिक महत्त्व, पुरवठा साखळीतील अस्थिरता, ऊर्जा व अन्नसुरक्षेची आव्हाने आणि बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेचा उदय यामुळे भारतासमोर नवीन संधी तसेच आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा परिस्थितीत भारताने कोणत्याही एका शक्तिकेंद्राशी पूर्णपणे बांधील न राहता आपल्या राष्ट्रीय हितानुसार विविध देशांशी सहकार्य करण्याची सामरिक स्वायत्तता स्वीकारली आहे.

सदर संशोधन लेखात विकसित भारत @ 2047 या संकल्पनेचा बदलत्या भू-राजकीय परिस्थितीच्या संदर्भात अभ्यास करण्यात आला आहे. भारताची सामरिक स्वायत्तता, ग्लोबल साऊथमध्ये भारताची भूमिका, बहुपक्षीय संस्थांमधील सहभाग आणि 2047 पर्यंत भारतासमोरील संधी व आव्हाने यांचे चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रस्तावना

जागतिक राजकारणाचा इतिहास पाहिला असता असे लक्षात येते की आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत कोणत्याही एका शक्तीचे वर्चस्व कायमस्वरूपी राहिलेले नाही. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएत संघ या दोन महासत्तांमध्ये संघर्ष होता. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर काही काळ अमेरिकेचे एकध्रुवीय वर्चस्व निर्माण झाले. मात्र, एकविसाव्या शतकात चीनचा उदय, रशियाची सामरिक भूमिका, युरोपियन संघाचे आर्थिक महत्त्व आणि भारतासारख्या उदयोन्मुख शक्तींची वाढ यामुळे जागतिक व्यवस्था अधिकाधिक बहुध्रुवीय होत आहे. या बदलत्या परिस्थितीत भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. भारत हा केवळ मोठी लोकसंख्या असलेला देश नसून आर्थिक, तांत्रिक, लष्करी, राजनैतिक आणि सांस्कृतिक क्षमतांच्या आधारावर जागतिक राजकारणातील प्रभावी शक्ती म्हणून पुढे येत आहे. त्यामुळे भारताचा 2047 पर्यंतचा विकास हा केवळ अंतर्गत विकासाचा विषय नसून त्याला आंतरराष्ट्रीय राजकारणाचीही महत्त्वपूर्ण जोड आहे.

भारताने 2047 पर्यंत विकसित राष्ट्र होण्याचे ध्येय स्वीकारले आहे. विकसित भारताची संकल्पना आर्थिक समृद्धीबरोबरच सामाजिक न्याय, शाश्वत विकास, मानवी भांडवल, तंत्रज्ञान, राष्ट्रीय सुरक्षा आणि जागतिक प्रभाव यांना

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

जोडते. नीती आयोगाच्या दृष्टिकोनानुसार विकसित भारतासाठी आर्थिक स्पर्धात्मकता, राष्ट्रीय सुरक्षा, जागतिक भागीदारी व धोरणात्मक प्रभाव आणि सक्षम शासनव्यवस्था हे परस्परांशी संबंधित घटक आहेत.

त्यामुळे 'विकसित भारत @ 2047'चा अभ्यास केवळ विकासाच्या आर्थिक चौकटीत करणे अपुरे ठरेल. भारताची जागतिक भूमिका, बदलते भू-राजकारण आणि परराष्ट्र धोरणातील सामरिक स्वायत्तता या घटकांचा विचार करणे आवश्यक आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

या संशोधनाचे प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत

- 'विकसित भारत @ 2047' या संकल्पनेचे राजकीय व आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्यात विश्लेषण करणे.
- बदलत्या जागतिक भू-राजकीय परिस्थितीत भारताच्या वाढत्या भूमिकेचा अभ्यास करणे.
- भारताच्या सामरिक स्वायत्ततेचे स्वरूप आणि त्याचे महत्त्व स्पष्ट करणे.
- ग्लोबल साऊथ आणि बहुपक्षीय जागतिक व्यवस्थेमध्ये भारताच्या उदयोन्मुख भूमिकेचे चिकित्सक मूल्यमापन करणे.
- 2047 पर्यंत भारतासमोरील प्रमुख संधी आणि आव्हाने स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व चिकित्सक विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये प्रामुख्याने दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आला आहे. भारत सरकारचे विविध अहवाल, परराष्ट्र मंत्रालयाचे दस्तऐवज, नीती आयोगाचे अहवाल, पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके आणि उपलब्ध अधिकृत संदर्भसाहित्य यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

विकसित भारत @ 2047 : केवळ आर्थिक विकासाची संकल्पना नव्हे

2047 हे भारताच्या स्वातंत्र्याचे शताब्दी वर्ष आहे. त्यामुळे 2047 हे केवळ एक कालमर्यादेचे वर्ष नसून भारताच्या विकासाच्या दीर्घकालीन दिशेचा विचार करण्याची संधी आहे. विकसित भारताची संकल्पना भारताला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच सामाजिकदृष्ट्या समावेशक, तंत्रज्ञानाच्या बाबतीत प्रगत, पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत आणि सुरक्षेच्या दृष्टीने सक्षम राष्ट्र बनविण्याशी संबंधित आहे.

विकासाचा पारंपरिक अर्थ प्रामुख्याने आर्थिक वाढ, औद्योगिकीकरण आणि उत्पन्नवाढ यांच्याशी जोडला जात होता. मात्र आजच्या काळात विकासाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, डिजिटल पायाभूत सुविधा, संशोधन व नवोन्मेष, रोजगार, सामाजिक न्याय आणि पर्यावरणीय शाश्वतता हे देखील विकसित राष्ट्राचे महत्त्वाचे निकष मानले जातात. नीती आयोगाच्या 2026 मधील कौशल्यविषयक अहवालातही विकसित भारताच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मानवी क्षमतेचा विकास आणि कौशल्यनिर्मितीला महत्त्व देण्यात आले आहे. याचबरोबर विकसित भारताची संकल्पना भारताच्या जागतिक भूमिकेशी जोडलेली आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत भारत जागतिक निर्णयप्रक्रियेत अधिक प्रभावी भूमिका बजावू शकतो. त्यामुळे अंतर्गत विकास आणि बाह्य प्रभाव यांचा परस्पर संबंध समजून घेणे आवश्यक आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

बदलते भू-राजकारण आणि भारतासमोरील नवे वास्तव

आजचे जागतिक राजकारण पूर्वीपेक्षा अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. अमेरिका आणि चीनमधील आर्थिक, तांत्रिक आणि सामरिक स्पर्धा ही त्यातील एक महत्त्वाची बाब आहे. दुसरीकडे रशिया-युक्रेन संघर्षामुळे युरोपियन सुरक्षा, ऊर्जा व्यवस्था आणि जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. पश्चिम आशियातील अस्थिरता, समुद्री मार्गांची सुरक्षा, ऊर्जा सुरक्षेचे प्रश्न आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील स्पर्धा यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे.

या परिस्थितीत भारतासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे स्वतःचे राष्ट्रीय हित सुरक्षित ठेवत विविध शक्तिकेंद्रांशी संबंध संतुलित ठेवणे. भारताचे अमेरिका, रशिया, युरोप, जपान, ऑस्ट्रेलिया आणि पश्चिम आशियातील देशांशी असलेले संबंध वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये विकसित झाले आहेत. त्यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण एका पारंपरिक गटबांधणीपेक्षा हिताधारित बहुआयामी संबंधांवर अधिक केंद्रित झालेले दिसते.

इंडो-पॅसिफिक प्रदेशाचे वाढते महत्त्वही भारताच्या जागतिक भूमिकेसाठी महत्त्वाचे आहे. हिंदी महासागर आणि प्रशांत महासागर यांना जोडणारा प्रदेश व्यापार, ऊर्जा, समुद्री वाहतूक आणि सामरिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतासाठी हा प्रदेश केवळ सुरक्षा विषय नसून आर्थिक आणि राजनैतिक संधींचाही केंद्रबिंदू आहे. या पार्श्वभूमीवर भारताला जागतिक राजकारणातील स्पर्धा आणि सहकार्य या दोन्ही प्रक्रियांमध्ये सक्रिय भूमिका बजावावी लागणार आहे. विकसित भारताच्या उद्दिष्टासाठी स्थिर बाह्य वातावरण, सुरक्षित समुद्री मार्ग, विश्वासार्ह पुरवठा साखळी आणि तंत्रज्ञानातील स्वावलंबन या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत.

सामरिक स्वायत्तता : भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आधार

भारताच्या परराष्ट्र धोरणातील एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे सामरिक स्वायत्तता. स्वातंत्र्यानंतर भारताने गटबाजीपासून दूर राहण्याचे धोरण स्वीकारले होते. शीतयुद्धाच्या काळातील अलिप्ततावादी धोरणाचा मूलभूत उद्देश भारताला कोणत्याही महासत्तेच्या प्रभावाखाली न ठेवता स्वतंत्र परराष्ट्र धोरण राबविणे हा होता. आज आंतरराष्ट्रीय परिस्थिती बदलली असली तरी स्वतंत्र निर्णयक्षमता ही संकल्पना कायम आहे. मात्र तिचे स्वरूप बदलले आहे. आधुनिक सामरिक स्वायत्ततेचा अर्थ कोणत्याही देशाशी संबंध न ठेवणे असा नसून, विविध देशांशी सहकार्य करताना अंतिम निर्णय राष्ट्रीय हिताच्या आधारे घेण्याची क्षमता असा होतो.

भारताचे उदाहरण या संदर्भात महत्त्वाचे आहे. भारत एकाच वेळी विविध शक्तींशी संबंध विकसित करतो आणि संरक्षण, ऊर्जा, तंत्रज्ञान, व्यापार, अंतराळ, अणुऊर्जा आणि सुरक्षा या क्षेत्रांमध्ये बहुआयामी सहकार्य करतो. यामुळे भारताला एका विशिष्ट शक्तिकेंद्रावर अवलंबून राहण्याची गरज कमी होते.

भारताच्या अणु धोरणाचाही या सामरिक स्वायत्ततेशी संबंध आहे. भारताने अणु तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात स्वदेशी क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न केला आणि राष्ट्रीय सुरक्षा तसेच शांततापूर्ण उपयोग यामध्ये संतुलन राखण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सामरिक स्वायत्तता ही केवळ परराष्ट्र धोरणातील संकल्पना न राहता राष्ट्रीय सुरक्षा, तंत्रज्ञान आणि आर्थिक क्षमतेशी जोडलेली व्यापक भूमिका बनते.

भारताची उदयोन्मुख जागतिक भूमिका

भारताच्या वाढत्या जागतिक भूमिकेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे ग्लोबल साऊथचा आवाज प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न. जानेवारी 2023 मध्ये भारताने 'व्हॉइस ऑफ ग्लोबल साऊथ समिट'चे आयोजन केले. या परिषदेत 125

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

देश सहभागी झाले होते. विकसनशील देशांच्या अन्नसुरक्षा, ऊर्जा, आरोग्य, हवामान, वित्त, शिक्षण आणि विकासाशी संबंधित प्रश्नांना जागतिक व्यासपीठावर स्थान देण्याचा त्यामागील उद्देश होता.

या उपक्रमातून भारताची भूमिका केवळ स्वतःच्या राष्ट्रीय हितापुरती मर्यादित नसून विकसनशील देशांच्या सामूहिक हितांशी जोडण्याचा प्रयत्न दिसून येतो. 2023 मधील दुसऱ्या व्हॉइस ऑफ ग्लोबल साऊथ समिटमध्येही जागतिक अस्थिरता, संघर्ष आणि भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर अधिक समावेशक जागतिक व्यवस्था निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

भारताची जागतिक भूमिका बहुपक्षीय संस्थांमधील सक्रिय सहभागातूनही स्पष्ट होते. संयुक्त राष्ट्रसंघ, जी-20, ब्रिक्स, शांघाय सहकार्य संघटना आणि इतर बहुपक्षीय व्यासपीठांवर भारत विविध विषय मांडत आहे. भारतासाठी बहुपक्षीयता ही केवळ राजनैतिक प्रक्रिया नसून जागतिक व्यवस्थेला अधिक प्रतिनिधिक आणि समावेशक बनविण्याचे साधन आहे.

भारताच्या या भूमिकेमध्ये 'वसुधैव कुटुंबकम्'सारख्या सांस्कृतिक विचारांचा वापर राजनैतिक भाषेत केला जातो. मात्र जागतिक नेतृत्वाच्या दाव्यापेक्षा प्रत्यक्ष कृती आणि सातत्यपूर्ण योगदान अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे भारताची उदयोन्मुख भूमिका ही घोषणांपेक्षा विकास, तंत्रज्ञान, मानवी मदत, हवामानविषयक सहकार्य, शांतता आणि बहुपक्षीय सुधारणांमधील प्रत्यक्ष योगदानावर आधारित असणे आवश्यक आहे.

8. 2047 पर्यंत भारतासमोरील संधी आणि आव्हाने

भारतासमोर 2047 पर्यंत अनेक मोठ्या संधी उपलब्ध आहेत. भारताची मोठी लोकसंख्या, तरुण मनुष्यबळ, वाढती डिजिटल क्षमता, तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती, विस्तारणारी अर्थव्यवस्था आणि मोठी बाजारपेठ या देशाच्या प्रमुख शक्ती आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, अवकाश तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, हरित ऊर्जा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि संरक्षण तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये भारताने मोठ्या प्रमाणात प्रगती करण्याची क्षमता आहे. 2026 मध्ये नीती आयोगाने डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून समावेशक सामाजिक-आर्थिक विकासासाठी स्वतंत्र धोरणात्मक मार्गदर्शक दस्तऐवजही प्रकाशित केला आहे.

परंतु या संधींसोबत गंभीर आव्हानेही आहेत. आर्थिक विकासाचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविणे, गुणवत्तापूर्ण रोजगार निर्माण करणे, शिक्षण व कौशल्य विकास सुधारणे, प्रादेशिक विषमता कमी करणे आणि पर्यावरणीय संतुलन राखणे आवश्यक आहे. केवळ उच्च आर्थिक वाढीचा दर प्राप्त करून विकसित राष्ट्र बनणे शक्य नाही.

राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही भारताला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागेल. सीमा सुरक्षा, सायबर सुरक्षा, दहशतवाद, समुद्री सुरक्षा, तंत्रज्ञानावरील अवलंबित्व आणि जागतिक पुरवठा साखळीतील अनिश्चितता यांचा भारताच्या विकासावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आर्थिक विकास आणि राष्ट्रीय सुरक्षा यांचा समन्वय करणे आवश्यक ठरेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारताला जागतिक शक्तींमधील स्पर्धेत स्वतःची स्वतंत्र निर्णयक्षमता कायम ठेवावी लागेल. सामरिक स्वायत्तता टिकवण्यासाठी आर्थिक सामर्थ्य, तांत्रिक क्षमता, संरक्षण क्षमता आणि सक्षम राजनैतिक व्यवस्था या सर्वांचा विकास करणे गरजेचे आहे.

चिकित्सक विश्लेषण

'विकसित भारत @ 2047' ही संकल्पना निश्चितच महत्त्वाकांक्षी आणि दीर्घकालीन आहे. मात्र तिचे यश केवळ सरकारच्या धोरणांवर अवलंबून राहणार नाही. केंद्र आणि राज्य सरकारे, उद्योग, शैक्षणिक संस्था, संशोधन क्षेत्र, नागरी समाज आणि सामान्य नागरिक यांचा सहभाग त्यासाठी आवश्यक आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

राजकीय शास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहता विकसित राष्ट्र होणे म्हणजे केवळ आर्थिक शक्ती प्राप्त करणे नव्हे. राज्याची संस्थात्मक क्षमता, लोकशाही मूल्यांची मजबुती, सामाजिक न्याय, कायद्याचे राज्य, नागरिकांचा सहभाग आणि प्रभावी प्रशासन हे देखील राष्ट्राच्या विकासाचे महत्त्वाचे घटक आहेत.

भारताला जागतिक स्तरावर अधिक प्रभावी भूमिका बजावायची असेल तर देशांतर्गत स्थैर्य आणि सामाजिक समावेशन यांना विशेष महत्त्व द्यावे लागेल. अंतर्गत विषमता मोठ्या प्रमाणात राहिल्यास बाह्य स्तरावरील शक्ती आणि प्रभाव मर्यादित राहू शकतो. त्यामुळे 'मजबूत भारत' आणि 'समावेशक भारत' या दोन्ही संकल्पनांचा समतोल साधणे आवश्यक आहे. याचबरोबर भारताने जागतिक नेतृत्वाचा दावा करण्याऐवजी 'जबाबदार जागतिक शक्ती' म्हणून आपली ओळख अधिक मजबूत करणे उपयुक्त ठरेल. ग्लोबल साऊथच्या प्रश्नांना आवाज देणे, हवामान बदलावर सहकार्य करणे, आपत्तीच्या काळात मदत करणे, तंत्रज्ञानाची उपलब्धता वाढवणे आणि बहुपक्षीय संस्थांच्या सुधारणांसाठी प्रयत्न करणे या माध्यमातून भारताची जागतिक विश्वासार्हता वाढू शकते.

निष्कर्ष

विकसित भारत @ 2047 हे भारताच्या भविष्यातील विकासाचे व्यापक ध्येय आहे. या ध्येयाकडे पाहताना आर्थिक विकासाबरोबरच राष्ट्रीय सुरक्षा, तंत्रज्ञान, सामाजिक न्याय, मानवी विकास, पर्यावरणीय शाश्वतता आणि जागतिक भूमिका या सर्व घटकांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे.

बदलत्या भू-राजकीय परिस्थितीमध्ये भारताची भूमिका पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची झाली आहे. अमेरिका-चीन स्पर्धा, बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था, इंडो-पॅसिफिकचे वाढते महत्त्व आणि ग्लोबल साऊथच्या प्रश्नांमुळे भारताला स्वतःच्या राष्ट्रीय हितांचे संरक्षण करत जागतिक प्रश्नांमध्ये अधिक सक्रिय भूमिका बजावण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

भारताची सामरिक स्वायत्तता ही या प्रक्रियेतील महत्त्वाची आधारशिला ठरू शकते. विविध शक्तिकेंद्रांशी सहकार्य करताना स्वतंत्र निर्णयक्षमता कायम ठेवणे आणि राष्ट्रीय हिताला सर्वोच्च स्थान देणे हीच आधुनिक सामरिक स्वायत्ततेची मूलभूत दिशा आहे. 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी आर्थिक आणि तांत्रिक सामर्थ्याबरोबरच सक्षम लोकशाही संस्था, सामाजिक समावेशन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य विकास, राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रभावी परराष्ट्र धोरण आवश्यक आहे. भारताने जर आपल्या अंतर्गत क्षमतांचा योग्य वापर केला आणि बदलत्या जागतिक व्यवस्थेत संतुलित, स्वायत्त व जबाबदार भूमिका कायम ठेवली, तर 2047 पर्यंत भारत केवळ विकसित राष्ट्र म्हणून नव्हे, तर जागतिक राजकारणातील प्रभावी, जबाबदार आणि विश्वासार्ह शक्ती म्हणून स्वतःचे स्थान अधिक दृढ करू शकतो.

संदर्भसूची :-

1. Government of India, Ministry of External Affairs. Voice of Global South Summit 2023. Ministry of External Affairs, 2023.
2. Government of India, Ministry of External Affairs. 2nd Voice of Global South Summit 2023. Ministry of External Affairs, 2023.
3. Government of India, NITI Aayog. Viksit Bharat by 2047: Strategic Framework for a Developed India. NITI Aayog, Government of India.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

4. Government of India, NITI Aayog. DPI@2047 for Viksit Bharat: A Strategic Roadmap to Enable Non-linear Inclusive Socio-economic Growth. NITI Aayog, Apr. 2026.
5. Government of India, NITI Aayog. Reimagining Skilling for Viksit Bharat@2047. NITI Aayog, Aug. 2026.
6. Jaishankar, S. The India Way: Strategies for an Uncertain World. HarperCollins India, 2020.
7. Pant, Harsh V. Indian Foreign Policy: An Overview. Manchester University Press, 2016.
8. Mohan, C. Raja. Crossing the Rubicon: The Shaping of India's New Foreign Policy. Viking, 2003.
9. Malone, David M. Does the Elephant Dance? Contemporary Indian Foreign Policy. Oxford University Press, 2011.
10. Kumar, Sanjay, and Prakash Chandra. Contemporary Indian Foreign Policy. Sage Publications.